(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

एस. सी.आर . ९०५

बोप्पण्णा वेंकटेस्वरालू आणि इतर

विरुद्ध

अधिक्षक , सेंट्रल जेल, हैदराबाद राज्य.

युनियन ऑफ इंडिया - मध्यस्थ.

[ मेहरचंद महाजन, एस. आर. दास आणि भगवती न्या. न्या. ]

प्रतिबंधक स्थानबद्धता - (द्वितीय सुधारणा ) कायदा (१९५ चा ४१ वा ) कलम ११ अ - २२ ऑगस्ट १९५२ रोजी संमत केलेला कायदा - ३० सप्टेंबर १९५२ रोजी अंमलात आला - प्रतिबंधक स्थानबद्धतेची मुदत ३० सप्टेंबर १९५२ रोजी संपुष्टात आली - स्थानबद्धता मुदत ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत वाढवल्याचा आदेश २२ सप्टेंबर १९५२ रोजी - मुदतवाढीच्या आदेशाची वैधता- सर्वसाधारण वाक्खंड कायदा (१८९७ चा १० वा), कलम २२ - १९५२ चा ६१ वा कायदा, कलम ११- अ (२), लागू करणे.

याचिकाकर्त्याला २० ऑक्टोबर १९५१ रोजी स्थानबद्धतेचा आदेश देण्यात आला होता आणि सल्लागार मंडळाच्या निर्देशन केल्यावर सरकारने स्थानबद्धता कायम केली आणि ३१ मार्च १९५२ ही तारीख निश्चित केली, जिथपर्यंत स्थानबद्धतेची मुदतवाढ दिली जाणार होती. २० मार्च १९५२ रोजी स्थानबद्धतेत ३० सप्टेंबर १९५२ पर्यंत वाढ करण्यात आली आणि २२ सप्टेंबर १९५२ रोजी स्थानबद्धतेत पुन्हा ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत वाढ करण्यात आली. याचिकाकर्त्या तर्फे असा युक्तिवाद केला गेला की २२ सप्टेंबर १९५२ रोजी स्थानबद्धतेत १

ऑक्टोबर १९५२ च्या पलीकडे  वाढ करण्याचा सरकारला कोणताही अधिकार नव्हता कारण १९५२ चा प्रतिबंधक स्थानबद्धता  (द्वितीय सुधारणा ) या कायद्याला , जरी ऑगस्ट , १९५२ मध्ये  राष्ट्रपतींची अनुमती  मिळाली असली  तरीही तो कायदा ३० सप्टेंबर १९५२ रोजीच अमलात आला  :

असे निर्णय दिला की,

(१) २२ सप्टेंबर रोजीच्या स्थानबद्धतेचा कालावधी वाढवण्याच्या आदेशा हा सर्वसाधारण वाक्खंड कायदाच्या कलम २२ च्या तरतुदींच्या अंतर्गत न्याय्य ठरू शकत नाही सदर कलमात  "आदेश" या शब्दाचा एक अर्थ असा आहे की आदेश जो अधिनियमांतर्गत गोष्टी कशा पद्धतीने करायच्या आहेत या संदर्भात निर्देश देतो , आणि सदर कलमाचा अर्थ असा नाही, की एखाद्या  कायदा अंमलात येण्यापूर्वीच त्या कायद्याच्या तरतुदींमध्ये  एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या विरोधात एक विशिष्ट ठोस आदेश  केला जाऊ शकतो.

(२) प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा  १९५२ च्या कलम ११- अ अंतर्गत 'आदेश' हा शब्द प्रारंभिक स्थानबद्धता  आदेशाचा संदर्भ देत नाही, कारण त्या आदेशात स्थानबद्धतेचा कोणताही कालावधी कायदेशीररित्या निश्चित  केला जाऊ शकत नाही, परंतु सदर कायद्याच्या कलम ११(१) च्या तरतुदीं अंतर्गत अंतिमत: पुष्टी केल्याप्रमाणे स्थानबद्धता  आदेशाला आणि याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धतेला १ एप्रिल १९५३ पर्यंत स्वयंचलितपणे मुदतवाढ मानली जाऊ शकत नाही कारण वास्तुस्थितीत याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धतेच्या प्रारंभिक आदेशात स्थानबद्धतेचा कोणताही कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही.

(३) याचिकाकर्त्याची स्थानबद्धता ३० सप्टेंबर १९५२ नंतर प्रतिबंधक स्थानबद्धता (द्वितीय सुधारणा ) कायदा, १९५२ च्या कलम ११- अ (२) या तरतुदींच्या जोरावर सुरू राहू शकली नाही, केवळ या कारणास्तव याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धतेची मुदत ३० सप्टेंबर, १९५२ रोजी संपणार होती, जी तारीख अपघाताने किंवा योगायोगाने पहिल्या दुरुस्ती कायद्याच्या (१९५२ चा ३४ कायदा) संपुष्टात येण्याच्या तारखेशी सुसंगत होती, कलम ११- अ (२) मध्ये केवळ अशी तरतूद आहे की जर आदेशात कमी कालावधी निश्चित केला असेल तर नजरकैदेत असलेली व्यक्ती सुटकेस पात्र असेल.

(४) कलम ११- अ (२) च्या अंतर्गत 'कमी कालावधी' ह्या अभिव्यक्तीचा अर्थ म्हणजे १ एप्रिल, १९५३ पर्यंत किंवा कलमामध्ये नमूद केलेल्या १२ महिन्यांच्या कालावधीच्या समाप्तीपर्यंत वाढलेला कालावधी असा आहे आणि ३० सप्टेंबर, १९५२ पूर्वी संपणारा कालावधी असा होत नाही.

(५) म्हणून ३० सप्टेंबर, १९५२ नंतर याचिकाकर्त्याला स्थानबद्ध करणे बेकायदेशीर होते.

मूळ अधिकारता : भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२ अंतर्गत (१९५२ चे क्रमांक ३३५, ३५०, ३५६, ३६२ आणि ३६६) बंदी प्रत्यक्षिकरणाच्या स्वरूपातील याचिका.

याचिकाकर्त्यांसाठी ए. एस. आर. चारी (न्यायमित्र).

आर. गणपथी अय्यर - १९५२ च्या याचिका क्रमांक ३३५ आणि ३५६ मधील उत्तरवादींसाठी.

हनुमंत राव वैष्णव - १९५२ च्या ३५०, ३६२ आणि ३६६ क्रमांकाच्या याचिकांमधील उत्तरवादींसाठी

भारताचे महान्यायअभिकर्ता सी. के. दफ्तरी (त्यांच्यासोबत पोरस ए. मेहता) यांनी हस्तक्षेपकर्त्यासाठी बाजू मांडली.

२४ नोव्हेंबर १९५२. न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. महाजन यांनी पारीत केला होता -

ही याचिका आणि इतर चार, म्हणजे, १९५२ च्या ३५०, ३५६, ३६२ आणि ३६६ क्रमांकाच्या याचिकांनी, प्रतिबंधक स्थानबद्धता (द्वितीय सुधारणा ) कायदा, १९५२ च्या ६१ द्वारे १९५० च्या ४ ह्या कायद्यामध्ये समाविष्ट केलेल्या कलम ११-अ च्या रचनेसंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे.

१९५० चा ४ कायदा, जो मुळात अस्तित्वात होता, तो १ एप्रिल १95१ रोजी संपुष्टात येणार होता, परंतु त्याच वर्षी हा दुरुस्ती करणारा कायदा मंजूर करण्यात आला होता, ज्यात इतर गोष्टींबरोबरच त्याचे अस्तित्व १ एप्रिल १९५२ पर्यंत वाढवले. प्रतिबंधक स्थानबद्धता (दुरुस्ती) कायदा, १९५२ या नावाचा एक नवीन कायदा १९५२ मध्ये (१९५२ चा ३४ कायदा) मंजूर करण्यात आला होता. या कायद्याचा परिणाम हा १९५० च्या कायद्याचे अस्तित्व आणखी सहा महिन्यांसाठी म्हणजेच १ ऑक्टोबर १९५२ पर्यंत वाढवणे होता. २२ ऑगस्ट १९५२ रोजी, प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा, १९५० मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, प्रतिबंधक स्थानबद्धता (द्वितीय सुधारणा ) कायदा ज्याला १९५२ चा ६१ म्हणतात, त्याला राष्ट्रपतींची अनुमती मिळाली, ज्याद्वारे कायद्याचे अस्तित्व ३१ डिसेंबर १९५४ पर्यंत वाढवण्यात आले होते.

केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या तारखेला तो अंमलात येणार होता . १५ सप्टेंबर १९५२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे, केंद्र सरकारने ३० सप्टेंबर १९५२ ही तारीख नवीन कायदा अंमलात येण्याची तारीख म्हणून नियुक्त केली.

याचिकाकर्त्याला २० ऑक्टोबर १९५१ रोजी स्थानबद्धतेचा आदेश बजावण्यात आला होता. १ नोव्हेंबर १९५१ रोजी त्यांना स्थानबद्धतेची कारणे देण्यात आली होती. त्यांचे प्रकरण २४ नोव्हेंबर १९५१ रोजी सल्लागार मंडळाकडे संदर्भित करण्यात आले होते. सल्लागार मंडळाने १३ डिसेंबर १९५१ रोजी आपला अहवाल सादर केला. समुचित सरकारने २१ जानेवारी १९५२ रोजी स्थानबद्धता कायम केली. त्यांनी ३१ मार्च १९५२ ही तारीख निश्चित केली, जिथपर्यंत स्थानबद्धता चालू ठेवायची होती. २९ मार्च १९५२ रोजी याचिकाकर्त्याच्या स्थानबद्धता ३० सप्टेंबर १९५२ पर्यंत वाढविण्यात आली होती आणि २२ सप्टेंबर १९५२ रोजी त्याच्या स्थानबद्धतेची पुन्हा ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत मुदतवाढ झाली. इतर याचिकांमध्येही मुदतवाढीचा शेवटचा आदेश २२ सप्टेंबर १९५२ रोजी देण्यात आला होता, ज्यात नस्थानबद्धतेची मुदत ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत वाढवण्यात आली होती. परंतु या मुदतवाढीसाठी नवीन कायद्यांतर्गत अधिकारांचा वापर केल्याशिवाय ३० सप्टेंबर १९५२ च्या नंतर स्थानबद्धता ही सुरू ठेवता येत नव्हती.

नजरकैदेत असलेल्या व्यक्तीकडून असा युक्तिवाद करण्यात आला की २२ सप्टेंबर १९५२ रोजी राज्य सरकारला १ ऑक्टोबर १९५२ नंतर स्थानबद्धता चालू ठेवण्यासाठी म्हणजे तेव्हा अंमलात असलेला असलेल्या कायद्याच्या अस्तित्वपलीकडे मुदतवाढीचा आदेश देण्याचे कोणतीही अधिकारता नव्हती आणि स्थानबद्धता कालावधी ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत

वाढवण्याचा आदेश हा बेकायदेशीर होता. आमच्या मते, हा उल्लेख साधार आहे. २२ सप्टेंबर १९५२ रोजी राज्य सरकारच्या वतीने केलेल्या आदेशाला, १९५२ च्या प्रतिबंधक स्थानबद्धता (द्वितीय सुधारणा ) कायद्याच्या तरतुदींनुसार स्थानबद्धतेचा कालावधी वाढवण्याचा अधिकार होता आणि सुधारित कायदा अद्याप अंमलात आला नसला तरी संसदेने तो कायदा मंजूर केल्यानंतर तो त्या अधिकारांचा वापर करू शकतो या कारणास्तव न्याय्य ठरवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रस्तावाची भिस्त सर्वसाधारण वाक्खंड कायद्याच्या (१८९७ चा दहावा) कलम २२ च्या तरतुदींवर ठेवण्यात आली होती. कलम २२ खालीलप्रमाणे तरतूद करते : -

" जेथे कोणताही केंद्रीय कायदा किंवा नियमन, जो तो संमत झाल्यानंतर ताबडतोब अंमलात येणार नाही, त्याद्वारे नियम किंवा उपविधी बनवण्याचा किंवा कायदा किंवा नियमन लागू करण्याबाबत आदेश जारी करण्याचा किंवा कायदा किंवा नियमनांतर्गत काहीही केव्हा किंवा ज्या ठिकाणी किंवा ज्या पद्धतीने करायचे आहे त्या वेळेच्या संदर्भात आदेश जारी करण्याचा अधिकार प्रदान केला गेला असेल, तर तो अधिकार हा कायदा किंवा नियमन संमत झाल्यानंतर कोणत्याही वेळी वापरला जाऊ शकतो; परंतु अशा प्रकारे केलेले किंवा जरी केलेले नियम, उपविधी किंवा आदेश कायदा किंवा नियमन सुरू होईपर्यंतअंमलात येणार नाहीत."

हे कलम १८९९ च्या इंग्रजी व्याख्या कायद्याच्या कलम ३७ शी अनुरूप आहे. ही एक सक्षम तरतूद आहे, जिचा हेतू आणि उद्देश हा कायदा अंमलात येण्याच्या अपेक्षेने, तो अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी नियम, उपविधी आणि आदेश, सुलभरीत्या तयार करणे हा आहे. दुसऱ्या शब्दांत, कायदा अंमलात येण्यापूर्वी केलेले नियम, उपविधी आणि आदेश हे

अधिनियम पारित झाल्यानंतर आणि कायदा अंमलात येण्याची पूर्वतयारी म्हणून केले असतील तर ते प्रमाणित करतात आणि ते राज्यसरकारला नवीन कायद्याच्या कोणत्याही विशिष्ट कलमान्वये प्रदान केलेल्या अधिकाराच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीविरुद्ध ठोस आदेश पारित करण्यासाठी अधिकृत करत नाही किंवा अधिकार देत नाही. सदर कलमाचे "च्या संदर्भात" " हे शब्द, या कलमान्वये देण्यात आलेल्या अधिकाराची मर्यादा आणि व्याप्ती विहित करतात. या कायद्यांतर्गत कोणतीही गोष्ट केव्हा आणि कशा पद्धतीने करायची आहे, याबाबतच आदेश जारी केले जाऊ शकतात. नव्या कायद्यातील कोणत्याही तरतुदींद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा कथित वापर करून स्थानबद्धतेत वाढ करण्याचा आदेश हा या कायद्यांतर्गत कोणतीही गोष्ट केव्हा आणि कशा पद्धतीने करायची आहे, यासंदर्भातील आदेश नाही. तसा आदेश केवळ कायद्यांतर्गत आणि कायदा अंमलात आल्यानंतरच करता येत होता, तो अंमलात येण्याच्या अपेक्षेने नाही. पूर्वलक्षी प्रभाव नसलेला हा कायदा, तो अंमलात येण्यापूर्वी केलेल्या आदेशाला मान्यता देऊ शकत नाही. आम्हाला असे वाटते की या कलमातील "आदेश" या शब्दाचा अर्थ कायद्यांतर्गत गोष्टी कशा पद्धतीने करायच्या याबद्दल निर्देश देणारा आदेश आहे आणि तो त्या स्वरूपाचा आदेश आहे जो कायदा अंमलात येण्यापूर्वी जारी केला जाऊ शकतो परंतु याचा अर्थ असा नाही की कायदा अंमलात येण्यापूर्वी एखाद्या विशिष्ट व्यक्तीविरुद्ध ठोस आदेश दिला जाऊ शकतो. सबब आमच्या मते, राज्य सरकारतर्फे मांडण्यात आलेल्या युक्तिवादाला जोर नाही आणि २२ सप्टेंबर १९५२ रोजी नजरकैदेत असलेल्या व्यक्तींना ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा आदेश बेकायदेशीर आहे.

केंद्र सरकारतर्फे विद्वान महान्यायअभिकर्ता यांनी हस्तक्षेप केला आणि असा युक्तिवाद केला की याचिकाकर्त्याची तसेच याचिकेशी संबंधित इतरांची स्थानबद्धता कायदेशीर होती

कारण या सर्व प्रकरणांमध्ये केलेल्या स्थानबद्धतेच्या प्रारंभिक आदेशात स्थानबद्धतेचा कालावधी निर्दिष्ट केला गेला नव्हता आणि कलम ११- अ (२) च्या जोरावर याचिकाकर्त्यांची स्थानबद्धता ही १ एप्रिल १९५३ पर्यंत आपोआप वाढवण्यात आली.

नवीन कायद्याचे कलम १० [प्रतिबंधक स्थानबद्धता  दुसरा (दुरुस्ती) कायदा, १९५२], नवीन कलम ११-अ जोडते, जे खालीलप्रमाणे आहेः

" (१) कलम ११ अंतर्गत कायम केलेल्या कोणत्याही स्थानबद्धता आदेशाच्या अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीला ज्या कमाल कालावधीसाठी स्थानबद्ध केले जाऊ शकते तो काळ, स्थानबद्धता  तारखेपासून बारा महिने असेल.

(२) उप, कलम (१) मध्ये काहीही असले तरी, प्रत्येक स्थानबद्धता आदेश जो प्रतिबंधक स्थानबद्धता  (द्वितीय सुधारणा ) कायदा, १९५२, सुरू होण्यापूर्वी कलम ११ अंतर्गत कायम केला आहे तो सदर आदेशात अल्प कालावधी निर्दिष्ट केल्याशिवाय, १ एप्रिल १९५३ पर्यंत किंवा स्थानबद्धतेच्या तारखेपासून बारा महिने संपेपर्यंत, जो कालावधी नंतर संपेल तोपर्यंत अंमलात राहील.

( ३) प्रतिबंधक स्थानबद्धता  (दुरुस्ती) कायदा, १९५२ (१९५२ चा ३४ ) च्या कलम ३ मध्ये याउलट काहीही समाविष्ट असले तरी, उपकलम (२) च्या तरतुदी प्रभावी ठरतील, परंतु या कलमात समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे यापूर्वीच्या कोणत्याही वेळी स्थानबद्धतेचा आदेश रद्द करण्याच्या किंवा त्यात बदल करण्याच्या  समुचित सरकारच्या अधिकारावर परिणाम होणार नाही.

असे सुचवण्यात आले होते की या कलमाच्या व्याकरणाच्या रचनेवर उपकलम (२) मधील 'आदेश' या शब्दाचा अर्थ स्थानबद्धता प्रारंभिक आदेश असा आहे आणि कायम करण्याच्या आदेशा असा संदर्भ देता येत नाही, कारण कायद्याद्वारे अशा कोणताही आदेशा सदर कायद्याने योजलेला नाही, असे सुचविण्यात आले. आमच्या मते, हा युक्तिवाद योग्य नाही. या न्यायालयाने १९५१ च्या याचिका क्रमांक ३०८ [माखन सिंग तारसिक्का विरुद्ध पंजाब राज्य ([1])] मध्ये अस निर्णय दिला होता की, स्थानबद्धता प्रारंभिक आदेशात स्थानबद्धतेचा कालावधी निश्चित करणे कायद्याच्या योजनेच्या विरुद्ध आहे आणि त्याचे समर्थन केले जाऊ शकत नाही कारण याचिकाकर्त्याचे प्रकरण सल्लागार मंडळासमोर मांडताना त्याचा योग्य विचार केला जातो. तो निर्णय १० डिसेंबर १९५१ रोजी घोषित करण्यात आला होता आणि कायद्यांच्या निर्मितीच्या सुप्रसिद्ध सिद्धांतानुसार आणि विधिमंडळाच्या तत्त्वांनुसार असे गृहीत धरायला हवे की जेव्हा संसदेने १९५२ च्या ६१ कायद्यातील कलम ११ - अ अंमलात आणला तेव्हा स्थानबद्धता प्रारंभिक आदेशात कोणताही कालावधी निर्दिष्ट केला जाऊ शकत नाही या न्यायालयाच्या निर्णयाची माहिती होती . त्यानंतर जेव्हा संसदेने उपकलम (२) मध्ये अशी तरतूद केली की "प्रत्येक स्थानबद्धतेचा आदेश जो कलम ११ अंतर्गत प्रतिबंधक स्थानबद्धता (द्वितीय सुधारणा) कायदा, १९५२ च्या १९५२ च्या प्रारंभापूर्वी कायम करण्यात आला आहे , तो आदेश अल्प कालावधी विनिर्दिष्ट केल्याशिवाय विशिष्ट तारखेपर्यंत अंमलात राहील, याचा अर्थ असा समजतो की, संसद, उपकलम (२) मध्ये अशी तरतूद करते कि, प्रतिबंधक स्थानबद्धता (द्वितीय सुधारणा) अधिनियम १९५२ लागू होण्यापूर्वी कलम ११ अंतर्गत कायम करण्यात आलेला प्रत्येक स्थानबद्धतेचा आदेश, हा, सदर आदेशामध्ये निश्चित अशा तारखेपर्यंत अल्प

1 (१९५२) एस. सी. आर. ३६८

कालावधी विनिर्दिष्ट केलेला नसेल तर निश्चित असा तारखेपर्यंत तो पुढे लागू राहतो, तिने (संसदेचा) “सदर आदेश ” या शब्दामागचा साधा सरळ हेतू आहे तो असा आहे, की स्थानबद्धतेचा सुरुवातीचा आदेश ज्यामध्ये स्थानबद्धतेचा कोणताही कालावधी कायदेशीररित्या विनिर्दिष्ट केला जाऊ शकत नाही या कारणास्तव संदर्भ देणे हा नाही परंतु , स्थानबद्धतेचा आदेश जो कलाम ११ (१) परिणामतः कायम केला जातो त्याचा संदर्भ देणे हा आहे . आम्ही कोणत्याही वादग्रस्त आधारावर नाही जेव्हा आम्ही म्हणतो की त्या टप्प्यावर प्रत्येक स्थानबद्धतेत असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत स्थानबद्धतेचा कालावधी निर्दिष्ट करणे समुचित सरकारसाठी खुले आहे. आम्हाला याचे समाधान आहे की जेव्हा उपकलम (२) हे आदेशातील कालावधीच्या विनिर्देशाला संदर्भित करतो, तेव्हा कलम ११ (१) अंतर्गत कायम केल्याप्रमाणे स्थानबद्धतेच्या आदेशाला संदर्भित करण्याचा त्याचा हेतू असतो आणि स्थानबद्धतेच्या प्रारंभिक आदेशाला नाही.

त्यानंतर असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधित आदेशात विनिर्देष्टित केलेला कालावधी हा कायद्याच्या अस्तित्वासाठी निश्चित केलेल्या तारखेशी सुसंगत असल्याने कालावधीचे विनिर्देश पूर्णपणे अनावश्यक आहेत आणि म्हणूनच नवीन कायद्यातील कलम ११ -अ च्या उपकलम (२) च्या जोरावर स्थानबद्धतेचा आदेश १ एप्रिल १९५३ पर्यंत चालू राहू शकतो, जणू काही आदेशात कोणताही कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही. हा युक्तिवाद कलम ११-अ (२) मध्ये वापरलेल्या भाषेवर टिकू शकत नाही.या कलमात वापरण्यात आलेले शब्दविन्यास हे १९५२ च्या ३४ कायद्याच्या कलम ३ मध्ये वापरल्या गेलेल्या भाषेपेक्षा अगदी वेगळे आहेत आणि जर तोच हेतू सांगण्याचा उद्देश असेल तर संसदेने १९५२

च्या ३४ कायद्याच्या कलम ३ मध्ये वापरल्याप्रमाणे समान भाषा कलम ११ - अ (२) मध्ये वापरली असती. ते कलम पुढीलप्रमाणे आहेः

" मूळ कायद्याच्या कलम ११ अंतर्गत कायम झालेला आणि या कायद्याच्या प्रारंभाच्या अगदी आधी अंमलात असलेला प्रत्येक स्थानबद्धतेचा आदेश, हा या कायद्याने सुधारित केलेल्या मूळ कायद्याच्या तरतुदींनुसार कायम झाल्यासारखा प्रभावी असेल आणि त्यानुसार, स्थानबद्धतेचा कालावधी एकतर अशा स्थानबद्धता आदेशात विनिर्दिष्ट केलेला नसेल किंवा (कोणत्याही प्रकारच्या शब्दांद्वारे) त्या कालावधीसाठी किंवा मूळ कायद्याच्या समाप्तीपर्यंत किंवा ३१ मार्च १९५२ पर्यंतचा कालावधी (कोणत्याही प्रकारच्या शब्दांद्वारे) निर्दिष्ट केलेला असेल, तर असा तर असा स्थानबद्धतेचा आदेश जोपर्यंत मुळ कायदा अंमलात असेल तोपर्यंत अंमलात राहील.

संसदेने, जेव्हा असे म्हणण्याचा हेतू असतो की, एखादया आदेशात विनिर्दिष्ट केलेली तारीख ही कायद्याच्या अस्तित्वाच्या तारखेपर्यंत संपणारी असेल, तेव्हा पुढील कालावधीसाठी स्थानबद्धता ही कायम राहील, असे तिने (संसदेने) स्पष्ट आणि निःसंदिग्ध भाषेत आणि योग्य शब्दांचा वापर करून सांगितले. संसदेला माहीत होते की अशी प्रकरणे असू शकतात ज्यात स्थानबद्धता करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेली तारीख कायद्याचा कालावधी संपण्याच्या तारखेबरोबर संपू शकते आणि अशा सर्व प्रकरणांचा समावेश करण्यासाठी कलम ३ मध्ये स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. तथापि, कलम ११ - अ (२) मध्ये, फक्त असे म्हटले आहे की जर आदेशात अल्प कालावधी विनिर्दिष्ट केला असेल तर नजरकैदेत असलेल्या व्यक्तीला सदर तारखेला त्याची सुटका होण्याचा हक्क असेल. याचिकाकर्त्याच्या विरोधात पारित केलेल्या

आदेशात आणि संबंधित याचिकांमध्ये पारित केलेल्या आदेशांमध्येही, ३० सप्टेंबर १९५२ ही तारीख विनिर्दिष्ट करण्यात आली होती, जिथपर्यंत स्थानबद्धता चालू राहू शकते आणि असे असल्याने, त्यांची सध्याची स्थानबद्धता त्या तारखेनंतर कलम ११-अ च्या उपकलम (२) च्या तरतुदींच्या जोरावर चालू ठेवू शकत नाही, कारण यासाठी ती तारीख अपघाताने किंवा योगायोगाने पहिल्या सुधारणा कायद्याची मुदत संपण्याच्या तारखेशी समान असते.

त्यानंतर असा युक्तिवाद करण्यात आला की जरी स्थानबद्धता कायम ठेवण्याची तारीख आदेशात विनिर्दिष्ट केली गेली असली तरी ती ३० सप्टेंबर १९५२ (ज्या तारखेला १९५२ चा ३४ कायदा संपुष्टात येणार होता) पेक्षा कमी कालावधी निश्चित करत नाही आणि नजरकैदेतील व्यक्तिला कलम ११ - अ च्या उपकलम (२) च्या तरतुदींचा लाभ मिळण्याचा हक्क नाही. हा युक्तिवाद मूलभूतपणे टिकवून ठेवणे कठीण आहे. "जर आदेशात अल्प कालावधी विनिर्दिष्ट केला नसेल तर" या शब्दांमध्ये स्पष्टपणे त्यानंतर लगेचच नमूद केलेल्या कालावधीचा संदर्भ आहे, म्हणजेच एक एप्रिल, १९५३ किंवा स्थानबद्धतेच्या तारखेपासून बारा महिन्यांची आदेश संपण्याची तारीख. त्यांच्याकडे १९५२ च्या ३४ कायद्याच्या समाप्तीच्या तारखेचा कोणताही संदर्भ नाही. या कलमाच्या साध्या वाचनाकडे आणि त्याच्या व्याकरणाकडे विद्वान महान्यायअभिकर्ता यांचे लक्ष वेधले गेले तेव्हा ते या गोष्टीशी सहमत झाले की तेथील 'अल्प' ह्या विशेषणाला १ एप्रिल १९५३ किंवा सदर कलमात उल्लेख केलेला बारा महिन्यांच्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेचा संदर्भ आहे आणि याचा अर्थ ३० सप्टेंबर १९५२ पूर्वीची तारीख असा होऊ शकत नाही.

वर दिलेल्या कारणमिंमासेमुळे, आमच्या निकालात, याचिकाकर्त्याला या याचिकेत आणि वर नमूद केलेल्या इतर याचिकांमध्ये ३० सप्टेंबर १९५२ नंतर ची स्थानबद्धता ही बेकायदेशीर होते आणि म्हणून आम्ही असे निर्देश देतो की याचिकाकर्त्यांची या याचिकेत आणि १९५२ च्या याचिका क्रमांक ३५०, ३५६, ३६२ आणि ३६६ मध्ये ताबडतोब सुटका करण्यात यावी. २२ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्थानबद्धतेची स्थानबद्धता ३१ डिसेंबर १९५२ पर्यंत वाढवण्याच्या आदेशामुळे त्यांना स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्या दिवशी जसा अंमलात होता तश्या कायद्यानुसार तो आदेश देण्याचा राज्य सरकारला कोणताही अधिकार नव्हता. विद्यमान आणि पूर्णपणे वैध आदेशाद्वारे त्यांची स्थानबद्धता कायम ठेवण्याची तारीख म्हणून ३० सप्टेंबर १९५२ ही विनिर्दिष्ट करण्यात आली होती आणि त्या तारखेनंतरचा त्यांचा स्थानबद्धता आदेश बेकायदेशीर आहे आणि कलम ११ - अ (२) च्या तरतुदींवर किंवा मूळ कायद्याच्या कलम ११ (१) च्या तरतुदींवर न्याय्य ठरू शकत नाही.

याचिका मंजूर

उत्तरवादींसाठी प्रतिनिधी आणि मध्यस्थ : जी. एच. राजाध्यक्ष

---------

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व

व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

---------